सकाळ

# 'अपयशातून...यशाकडे' उपक्रमाला कोल्हापूरसह तीन ठिकाणी सुरवात

कोल्हापूर, ता. १० : दहावी निकालाच्या पार्श्वभूमीवर परीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळालेल्या किंवा नापास झाल्याने निराश झालेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांना न खचता पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी 'सकाळ'तर्फे आयोजित केलेल्या 'अपयशातून...यशाकडे!' या उपक्रमाला आज सुरवात झाली. 'सकाळ' व 'मनोविकास प्रबोधिनी'तर्फे तेरा जूनपर्यंत हा उपक्रम सुरू आहे.

जिल्ह्यात गडहिंग्लज व इचलकरंजी येथील प्रत्येकी एक, तर कोल्हापूर शहरातील दोन केंद्रावर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी सुमारे चाळीस मानसोपचारतज्ज्ञ या केंद्रांवर मार्गदर्शनासाठी उपस्थित असतील.

कोल्हापूर शहरात आज दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर दुपारी तीननंतर या उपक्रमाला सुरवात झाली. शहरात दसरा चौकातील शहाजी छत्रपती महाविद्यालय व ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेज येथील केंद्रावर हा उपक्रम सुरू झाला. उद्यापासून (मंगळवार) दुपारी अकरा ते सायंकाळी सहा या वेळेत याठिकाणी तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. त्यासाठी या केंद्रावर दूरध्वनीद्वारेही नोंदणी करता येईल. त्यासाठीचे दूरध्वनी क्रमांक असे : शहाजी महाविद्यालय- ६४२९२१, कमला कॉलेज - ५३८३५९.

आज शहाजी महाविद्यालय येथे प्रा. विश्वास तडसरे, भरत नाईक, सौ. छाया पोळ, आबासाहेब चौगुले या तज्ज्ञांसह बाबासाहेब थमेलट्टी, मंजिरी मुनिश्वर, इंद्रजित पाटील हे मार्गदर्शनासाठी उपस्थित होते.

कमला कॉलेज येथे प्रा. एस. जी. माळी, प्रा. ए. एस. परीट, प्रा. बी. बी. मगदूम, प्रा. अनिल घस्ते, प्रा. एस. जी. कदम यांच्यासह दीपा माणगावकर, शबाना कुरेशी, प्रसिधा मेनन, आरती माणगावकर, प्रदीप पाटील उपस्थित होते. या केंद्रावर विद्यार्थी व त्याचे पालक यांच्याकडून शास्त्रीय पद्धतीने माहिती संकलित केली जाते. त्यावर चर्चा केली जाते. तसेच विद्यार्थ्यांची कल चाचणी घेतली जाते व पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले जाते.

## मृत्यूस कारणीभूत डॉक्टरांवर कारवाई न झाल्यास आंदोलन

### सौ. यादव यांच्या नातेवाईकांचा इशारा

कोल्हापूर, ता. १० : सौ. सुरेखा रणजित यादव हिच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या डॉक्टरांवर कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा तिच्या नातेवाईकांनी दिला आहे. शस्त्रक्रिया करताना तिच्या झालेल्या मृत्यूला डॉ. प्रसाद हलकर्णीकर व डॉ. गीता हलकर्णीकर जबाबदार असल्याची तक्रार राजारामपुरी पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे.

दरम्यान, सौ. यादव यांचा शवविच्छेदन अहवाल राखून ठेवण्यात आला असून, अधिक स्पष्टीकरणासाठी व्हिसेरा पुण्यास वैद्यकीय प्रयोगशाळेत पाठविला आहे. काल रात्री वैद्यकीय तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांसमोर शवविच्छेद करण्यात आले.